सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन, राजगुरू हुतात्मा चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई-३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. ११ जानेवारी २०१७

**२५ जिल्हा परिषदा व २८३ पंचायत समित्यांसाठी १६ व २१ फेब्रुवारीला मतदान**
**१० महानगरपालिकांसाठी २१ फेब्रुवारीला मतदान; सर्व मतमोजणी २३ फेब्रुवारीला**
**-राज्य निवडणूक आयुक्त सहारिया यांची घोषणा**

मुंबई, दि. ११: बृहन्मुंबईसह राज्यातील १० महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २१ फेब्रुवारी २०१७ रोजी मतदान होणार आहे. २५ जिल्हा परिषदा व २८३ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी दोन टप्प्यांत १६ फेब्रुवारी व २१ फेब्रुवारी २०१७ रोजी मतदान होईल. पहिल्या टप्यात १५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गतच्या १६५ पंचायत समित्या आणि दुसऱ्या टप्प्यात ११ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गतच्या ११८ पंचायत समित्यांचा समावेश आहे. गडचिरोली जिल्ह्याची दोन्ही टप्प्यांत विभागणी केली आहे. सर्वांची मतमोजणी २३ फेब्रुवारी २०१७ रोजी होईल, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे पत्रकार परिषदेत केली.

निवडणूक कार्यक्रमाची घोषणा करण्यासाठी येथील सचिवालय जिमखान्यात ही पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. आयोगाचे सचिव शेखर चन्ने हेदेखील यावेळी उपस्थित होते. श्री. सहारिया यांनी सांगितले की, निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून सर्व संबंधित जिल्ह्यांत आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणूक नसलेल्या क्षेत्रांत नियमित विकास कामांसाठी कोणतेही निर्बंध असणार नाहीत; परंतु निवडणूक असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारांवर प्रभाव टाकणारी कोणतीही कृती किंवा घोषणा करता येणार नाही.

न्यायालयीन प्रकरणांसंदर्भात श्री. सहारिया म्हणाले की, नागपूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गतच्या पंचायत समित्यांच्या निवडणुकांना मा. उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. त्यामुळे त्यांचा या कार्यक्रमात समावेश केलेला नाही. त्याचबरोबर न्यायालयीन स्थगिती असलेल्या एखाद्या जिल्हा परिषद निवडणूक विभागाला किंवा पंचायत समिती निर्वाचक गणालाही हा कार्यक्रम लागू होणार नाही. न्यायालयाच्या आदेशानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल; तसेच अन्य काही याचिकाही दाखल झाल्या आहेत. या याचिकांवरील निर्णयाच्या अधिन राहून हा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे.

**२१ फेब्रुवारीला निवडणूक होणाऱ्या महानगरपालिकांच्या जागा (कंसात मुदत समाप्तीचा दिनांक):** **बृहन्मुंबई-** २२७ (८ मार्च २०१७), **ठाणे-** १३१ (५ मार्च २०१७), **उल्हासनगर-** ७८ (३ एप्रिल २०१७), **नाशिक-** १२२ (१४ मार्च २०१७), **पुणे-** १६२ (१४ मार्च २०१७), **पिंपरी-चिंचवड-** १२८ (१२ मार्च २०१७), **सोलापूर-** १०२ (५ मार्च २०१७), **अकोला-** ८० (८ मार्च २०१७), **अमरावती-** ८७ (८ मार्च २०१७) व **नागपूर-** १५१ (४ मार्च २०१७).

| **महानगरपालिका निवडणूक कार्यक्रम** | |
|---|---|
| **तपशील** | **दिनांक** |
| नामनिर्देशनपत्र सादर करणे | २७ जानेवारी ते ३ फेब्रुवारी २०१७ |
| नामनिर्देशनपत्रांची छाननी | ४ फेब्रुवारी २०१७ |
| उमेदवारी माघारीची मुदत | ७ फेब्रुवारी २०१७ |
| निवडणूक चिन्ह वाटप | ८ फेब्रुवारी २०१७ |
| मतदान केंद्रनिहाय मतदार यादीची प्रसिद्धी | ८ फेब्रुवारी २०१७ |
| मतदानाचा दिनांक | २१ फेब्रुवारी २०१७ |
| मतमोजणीचा दिनांक | २३ फेब्रुवारी २०१७ |

**पहिल्या टप्प्यात १६ फेब्रुवारीला निवडणूक होणाऱ्या जिल्हा परिषदा:** जळगाव, अहमदनगर, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, बुलडाणा, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील ८ पंचायत समित्या व त्यातील निवडणूक विभाग. (या जिल्हा परिषदांतर्गतच्या एकूण १६५ पंचायत समित्या)

**दुसऱ्या टप्प्यात २१ फेब्रुवारीला निवडणूक होणाऱ्या जिल्हा परिषदा:** रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे, सोलापूर, नाशिक, अमरावती व गडचिरोली जिल्ह्यातील ४ पंचायत समित्या व त्यातील निवडणूक विभाग (या जिल्हा परिषदांतर्गतच्या एकूण ११८ पंचायत समित्या)

दोन्ही टप्प्यांतील सर्व जिल्हा परिषदांची मुदत २१ मार्च २०१७ रोजी; तर पंचायत समित्यांची मुदत १३ मार्च २०१७ रोजी संपत आहे.

| **जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचा निवडणूक कार्यक्रम** | | |
|---|---|---|
| **निवडणूक कार्यक्रम तपशील** | **पहिला टप्पा (१५ जि. प. व १६५ पं.स.)** | **दुसरा टप्पा (११ जि. प. व ११८ पं.स.)** |
| नामनिर्देशनपत्र सादर करणे | २७ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०१७ | १ ते ६ फेब्रुवारी २०१७ |
| नामनिर्देशनपत्रांची छाननी | २ फेब्रुवारी २०१७ | ७ फेब्रुवारी २०१७ |
| जिल्हा न्यायाधीशांकडे अपील | ५ फेब्रुवारी २०१७ | १० फेब्रुवारी २०१७ |
| निकालाची संभाव्य अंतिम तारीख | ८ फेब्रुवारी २०१७ | १३ फेब्रुवारी २०१७ |
| अपील नसल्यास उमेदवारीची माघार | ७ फेब्रुवारी २०१७ | १३ फेब्रुवारी २०१७ |
| अपील असल्यास उमेदवारीची माघार | १० फेब्रुवारी २०१७ | १५ फेब्रुवारी २०१७ |
| मतदान केंद्रांची यादी प्रसिद्धी करणे | १० फेब्रुवारी २०१७ | १५ फेब्रुवारी २०१७ |
| मतदानाचा दिनांक | १६ फेब्रुवारी २०१७ | २१ फेब्रुवारी २०१७ |
| मतमोजणीचा दिनांक | २३ फेब्रुवारी २०१७ | २३ फेब्रुवारी २०१७ |

**बहुसदस्यीय पद्धत**

बृहन्मुंबई वगळून अन्य सर्व नऊ महानगरपालिकांच्या निवडणुका बहुसदस्यीय पद्धतीने होतील. बहुतांश प्रभाग चार सदस्यांचे आहेत; परंतु ठाणे, अमरावती व नागपूर महानगरपालिकेतील प्रत्येकी एक प्रभाग तीन सदस्यांचा; तर उल्हासनगर, नाशिक, पुणे व सोलापूर महानगरपालिकेचे प्रत्येकी दोन प्रभाग तीन सदस्यांचे आहेत. त्यामुळे मतदारांना चार किंवा तीन मते द्यावी लागतील. जिल्हा परिषदांच्या निवडणूक विभागातील उमेदवारासाठी व पंचायत समितीच्या निर्वाचक गणातील उमेदवारासाठी प्रत्येकी एक अशी दोन मते ग्रामीण भागातील मतदारांना द्यावी लागतील.

**नामनिर्देशनपत्रांसाठी संगणकीय प्रणाली**

या निवडणुकांसाठी संगणकीय प्रणालीद्वारे नामनिर्देशनपत्रे व शपथपत्रे दाखल करण्याची सुविधा आयोगाने उपलब्ध करून दिलेली आहे. त्यासाठी संकेतस्थळ विकसित केले आहे. नामनिर्देशनपत्रे सादर करण्यास सुरूवात झाल्यानंतनर संगणकीय प्रणालीद्वारे कुठल्याही वेळेस संगणकावर नामनिर्देशनपत्रे व शपथपत्रे भरता येतील. त्याची प्रिंट काढून त्यावर सही करून ते विहीत वेळेतच निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे देणे बंधनकारक आहे.

उमेदवारांना शपथपत्रे स्टॅम्प पेपरवर सादर करण्याची आवश्यकता नाही. नामनिर्देशनपत्रे संगणक प्रणालीद्वारे भरण्याची सुविधा उपलब्ध असली तरी उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज संगणकाद्वारे सादर करण्याची आवश्यकता नाही. उमेदवारांना नामनिर्देशनत्रे व शपथपत्रे भरण्यास अडचण उद्‌भवू नये यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी एक किंवा त्यापेक्षा जास्त मदत कक्षाची स्थापना करावी; तसेच सायबर कॅफे व कम्युनिटी फॅसिलिटेशन सेंटरची मदत घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

**जात पडताळणी प्रमाणपत्राचा पुरावा**

उमेदवारी अर्जासोबत जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे; परंतु जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास जात पडताळणी समितीकडे अर्ज केल्याची पावती किंवा अन्य पुरावा देण्याची मुभा

देण्यात आली आहे. संबंधित उमेदवारांनी निकाल लागल्यानंतर सहा महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. अन्यथा त्याची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्याची संबंधित अधिनियमात तरतूद आहे.

**ट्रू व्होटर ॲप**

सर्वसामान्य नागरिक, मतदार, राजकीय पक्ष, उमेदवार, निवडणूक अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी ट्रू व्होटर ॲप विकसित केले आहे. हे ॲप नगरपरिषद व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी उपयुक्त ठरले आहे. या ॲपमुळे मतदारांना मतदार यादीतील आपले नाव आणि मतदान केंद्र शोधता येणे शक्य होईल. उमेदवारांनी शपथपत्राद्वारे भरलेली माहितीदेखील या ॲपच्या माध्यमातून पाहता येईल. या ॲपच्या माध्यमातून उमेदवारांना आपला दैनंदिन खर्च देखील सादर करणे शक्य होईल. तसेच निवडणुकीचा निकालही मिळू शकेल.

**आदर्श मतदान केंद्रे**

सर्व ठिकाणची मतदान केंद्रे आदर्श स्वरूपाची असतील यादृष्टीने आयोग प्रयत्नशील आहे. पिण्याच्या पाण्याची, सावलीची व शौचालयाची व्यवस्था सर्व मतदान केंद्रांवर करण्यात येईल. रॅम्पचीही व्यवस्था केली जाईल.

**संनियंत्रण समिती**

आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करणे, खर्चावर नियंत्रण ठेवणे, आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे व प्रलोभनाला आळा घालण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली संनियंत्रण समिती स्थापन केली जाईल. महानगरपालिका निवडणुकांसाठी महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती असेल. या समितीत जिल्हा पोलीस अधीक्षक किंवा पोलीस आयुक्त, आयकर, विक्रिकर, अबकारी, बँक, परिवहन, सार्वजनिक बांधकाम, विद्यापीठे इत्यादी विभागांचे प्रतिनिधी; तसेच जिल्हा माहिती अधिकारी अथवा महानगरपालिका जनसंपर्क अधिकाऱ्याचा समावेश असेल.

**मतदार नोंदणीसाठी जनजागृती**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी विधानसभा मतदार संघाचीच मतदार यादी वापरली जाते. विधानसभेची मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी भारत निवडणूक आयोगातर्फे ८ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर २०१५ आणि १६ सप्टेंबर ते २१ ऑक्टोबर २०१६ या कालावधीत मतदार यादी पुनरीक्षण कार्यरक्रम राबविण्यात आला होता. याचे औचित्य साधून महानगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या दृष्टीने मतदार नोंदणीसाठी व मतदार यादीतील तपशिलांतील दुरुस्त्यांसाठी व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात आली होती.

**२१ जानेवारीला अंतिम मतदार यादी**

या निवडणुकांसाठी भारत निवडणूक आयोगातर्फे ५ जानेवारी २०१७ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली विधानसभेची मतदार यादी ग्राह्य धरण्यात येईल. ही यादी महानगरपालिकेसाठी प्रभागनिहाय, जिल्हा परिषदेसाठी निवडणूक विभागनिहाय व पंचायत समित्यांसाठी निर्वाचक गणनिहाय विभागण्यात येईल. त्यावर १२ ते १७ जानेवारी २०१७ पर्यंत हरकती दाखल करता येतील. त्यानंतर २१ जानेवारी २०१७ रोजी अंतिम यादी प्रसिद्ध होईल.

**मतदार यादीत याच दुरूस्त्या शक्य**

विधानसभेच्या मतदार मतदार यादीत नवीन मतदार म्हणून नावाच्या समावेशासाठी २१ ऑक्टोबर २०१६ पर्यंत अर्ज केलेल्या व त्यातील भारत निवडणूक आयोगाने मंजूर केलेल्या नावांचाच महानगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या मतदार यादीत समावेश असेल. विधानसभेच्या मूळ मतदार यादीत कोणत्याही दुरुस्त्या होणार नाहीत. प्रभागनिहाय विभाजन करताना झालेल्या चुकाच फक्त दुरूस्त करता येतील.

**मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना**

- विद्यापीठे व महाविद्यालयांचा मतदार जागृतीत सक्रीय सहभाग
- सहकारी गृहनिर्माण संस्थांना सक्रीय सहभागाचे आवाहन
- उद्योजक, बँक व कंपन्यांकडून सकारात्मक प्रतिसाद
- हॉटेल असोशिएशनचा मतदार जागृतीसाठी उत्स्फूर्त प्रतिसाद
- उपलब्ध कम्युनिटी रेडिओचा प्रभावी वापर
- सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यापक जनजागृती
- नाटकाच्या मध्यंतरात थीएटरमध्ये मतदानाबाबत उद्‍घोषणा

**राजकीय पक्षांसोबत विचारविनिमय**

निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांसोबत विचारविनिमय करण्यात आला आहे. त्यासाठी राजकीय पक्षांसोबत चार वेळा बैठका घेण्यात आल्या आहेत. त्यात संगणकीय प्रणालीद्वारे नामनिर्देशनपत्रे भरणे, महानगरपालिकांसाठी बहुसदस्यीय पद्धत, उमेदवारांनी व राजकीय पक्षांनी खर्च सादर करणे या विषयांवर सविस्तर चर्चा झाली.

**आयोगाकडील नोंदणीकृत पक्ष**

- आतापर्यंत नोंदणी रद्द केलेले पक्ष- २२०
- नोंदणीकृत व मान्यताप्राप्त राजकीय पक्ष- १५
- नोंदणीकृत राजकीय पक्ष- १९०
- एकूण राजकीय पक्ष- २०५

**...तर उमेदवार अनर्ह**

उमेदवारांना एकूण खर्चाचा तपशील निकाल लागल्यानंतर ३० दिवसांच्याआत संबंधित जिल्हाधिकारी किंवा महानगरपालिका आयुक्तांकडे सादर करावा लागेल. विहीत पद्धतीने व मुदतीत खर्च सादर न केल्यास संबंधित उमेदवारास अनर्ह केले जाईल. राजकीय पक्षांनी विशिष्ट उमेदवारावर केलेला थेट खर्च आणि उमेदवारांमध्ये विभाजित करता येणारा खर्च २० दिवसांत सादर करणे आवश्यक आहे. निवडणूक खर्चासाठी स्वीकारलेला निधी व स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय एकूण खर्चाचा तपशीलही पक्षांना निकाल लागल्यानंतर ६० दिवसांच्या आत द्यावा लागेल.

**महानगरपालिका निवडणूक दृष्टिक्षेप**

- महानगरपालिकांची संख्या- १०
- एकूण लोकसंख्या- २,५७,१९,०९३
- एकूण प्रभाग- ४९०
- एकूण जागा- १,२६८
- महिला- ६३६
- अनुसूचित जाती- १७१
- अनुसूचित जमाती- ३८
- नागरिकांचा मागसप्रवर्ग- ३४३

**जिल्हा परिषद निवडणूक दृष्टिक्षेप**

- जिल्हा परिषदांची संख्या- २५
- एकूण लोकसंख्या- ५,०९,३७,६०६
- एकूण जागा- १,५१०
- महिला- ७६१
- अनुसूचित जाती- १८९
- अनुसूचित जमाती- १५६
- नागरिकांचा मागसप्रवर्ग- ४०८

**पंचायत समिती निवडणूक दृष्टिक्षेप**

- पंचायत समित्याची संख्या- २८३
- एकूण लोकसंख्या- ५,०६,५६,३७३
- एकूण जागा- ३,०००
- महिला- १,५००
- अनुसूचित जाती- ३८६
- अनुसूचित जमाती- २९३
- नागरिकांचा मागसप्रवर्ग- ७९७

(Jagdish More, PRO, SEC)